INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 12 | JANUARY - 2022

# ''कामाच्या ठिकाणी एसटी महिला वाहकांचा लैंगिक छळ : स्वरूप व प्रतिबंधात्मक यंत्रणांची अंमलबजावणी''

प्रा. अर्चना पडगीलवार
सहयोगी प्राध्यापक,
जी.एन.आझाद समाजकार्य महाविदयालय पुसद जि.यवतमाळ.

**सारांश (Abstract)**

महाराष्ट्र शासनाने सन 2005 मध्ये; महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामधील (MSRTC) ज्यालाच **'एसटी'** या प्रसिध्द नावाने ओळखले जाते त्याठिकाणी वाहक पदावर महिला नोकरी करू शकतील असे धोरण जाहिर केले. हे धोरण निश्चितच सर्वांसाठी आश्चर्यचकीत करणारे होते. कारण वाहक पदाच्या जबाबदाऱ्या, या पदाचा अन्य घटकांशी येणारा संबंध, दररोजचा प्रवास हा वाहक म्हणून कशा सांभाळू शकतील हा प्रश्न चिन्ह होता. या धोरणाला महिलांनी नविन आव्हान म्हणून स्वीकारले व त्या कोणत्याही क्षेत्रात कार्य करून शकतात हे सिध्द सुध्दा करून दाखविले. मात्र यामध्ये पुरूषी स्वभाव, अहंकार, पुरूषप्रधान समाजव्यवस्थेवर 'मनू' प्रभावी असलेला विचार यातून त्यांचा लैंगिक छळ होण्याची शक्यता होती. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ ही बाब नवीन नसल्यामूळे बसमधील सततचा प्रवास, बसमधील प्रचंड गर्दी यामध्ये महिला वाहकांचा होणारा लैंगिक छळ व त्यासंरक्षणार्थ एसटी महामंडळाने उभी केलेली यंत्रणा याविषयीचा अभ्यास प्रस्तूत निबंधातून करण्यात आला आहे.



**कि वर्ड–** एसटी, महिला वाहक, लैंगिक छळ, संरक्षणार्थ यंत्रण

## ▪ प्रस्तावना–

भारतात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये वर्षनिहाय वाढ होत असल्याचे दिसून येते. यामध्ये कामाच्या ठिकाणी 'महिलांचा लैंगिक छळ कायदा 2013' अंतर्गत नोंदविलेल्या गुन्हयांची संख्या जरी कमी असली तरी मात्र कामाच्या ठिकाणी महिलांचा मोठया प्रमाणात लैंगिक छळ होतो. बहुतांश वेळा महिला त्याकडे दुर्लक्ष करातात. तर काही महिला छळाच्या स्वरूपाबाबत जागृत नसल्यामूळे ते प्रकार दुर्लक्षित होतात. तथापी अशा प्रकारचा छळ होत असेल तर कोणत्या ठिकाणी तक्रार करावी या विषयीची माहिती नसते तसेच ज्या आस्थापणांमध्ये महिला नोकरी करतात त्या आस्थापणांमध्ये तक्रार निवारण समिती स्थापना केलेली नसते वा त्याकडून न्याय मिळेल या विषयीचा त्यांना विश्वास नसतो. अशा अनेक कारणांमूळे कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ होत राहतो.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये (एसटी) नोकरी करणाऱ्या महिला वाहक; कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या स्वरूपाविषयी जागृक आहेत का तथा छळाच्या संदर्भात तक्रार निवारण करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या यंत्रणा उभारलेल्या आहेत त्याविषयीची स्थिती प्रस्तूत अध्ययनातून अभ्यासण्यात आली. हा

शोध निबंध प्राथमिक तथ्यावर आधारीत असून यासाठी बुलडाना जिल्हयातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये वाहक पदावर कार्यरत महिलांचा समावेश करण्यात आला होता.

## ▪ शोध निबंधाचे उददेश–

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये (एसटी) नोकरी करणाऱ्या महिला वाहकांचा कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाचे स्वरुप अभ्यासून आस्थापनाने उभारलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अभ्यास करणे, हा या शोध निबंधाचा मुख्य उददेश आहे.

## ▪ शोध निबंधासाठी उपयोगात आणलेल्या व्यावहारीक व्याख्या

### 1. लैंगिक छळ–

'लैंगिक छळ' या शब्दाचा अर्थ कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा 2013' मध्ये जी व्याख्या दिलेली आहे, त्यानुसार घेण्यात आला आहे. यामध्ये शारीरिक संपर्क, किंवा त्याबाबत पुढाकार, लैंगिक स्वरूपाची मागणी किंवा विनंती, लैंगिक अर्थाच्या टिप्पणी, अश्लिल चित्र किंवा तत्सम गोष्टी दाखवणे, अन्य कोणतीही नको असताना केलेली शारीरिक, तोंडी किंवा शब्दात व्यक्त न केलेली लैंगिक स्वरूपाची कृती म्हणजे लैंगिक छळ होय''

### 2. कामाचे ठिकाण–

'महिला वाहकांच्या संदर्भात कामाचे ठिकाण म्हणजे वाहक पदाची जबाबदारी पार पाडतांना ज्या ठिकाणाशी संबंध तथा संपर्क येतो ती सर्व ठिकाण, कामाचे ठिकाण म्हणून अपेक्षित आहे. यामध्ये बसस्थानक, कार्यशाळा, प्रशिक्षण स्थळ तसेच बस वाहतूक करतांना बस चे अंतर्गत स्थान व बाहय परिसर तथा ते सर्व स्थान जीथे महिला वाहकांचा संबंध येतो.

## ▪ अध्ययन पध्दती–

प्रस्तूत अध्ययन प्राथमिक तथ्यावर आधारीत असून तथ्य संकलनासाठी बुलडाना जिल्हयातील 07 (बुलडाणा, चिखली, खामगाव, शेगाव, मेहकर, मलकापूर, जळगाव जामोद) एसटी डेपोमध्ये महिला वाहक पदी कार्यरत असलेल्या एकूण 28 महिला वाहकांची सहेतूक नमुना निवड पध्दती अंतर्गत निवड करण्यात आली. तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची चा उपयोग करून मुख्यत्वे गुणात्मक व संख्यात्मक तथ्य गोळा करून विश्लेषण करण्यात आले.

### 1. प्रवासी वाहतूक व कार्यालयीन कामकाजा दरम्यान छळाचे स्वरूप–

महाराष्ट्रात प्रवासी वाहतूकीसाठी एसटी बस हे महत्वाचे साधन मानल्या जाते. सर्वाधिक प्रवासी एसटीलाच प्रथम पसंती देतात. त्यामूळे एसटी मध्ये बहुतांशवेळा आसन क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी प्रवास करतात. बस मधील गर्दी महिला वाहकांसाठी अनेकदा लैंगिक छळास कारणीभूत ठरते. या अनुषंगाने महिला वाहकांचा कशा प्रकारचा लैंगिक छळ होतो हे अभ्यासले असता प्रवाशांकडून असूरक्षित स्पर्श केला जातो असे 22(78. 57टक्के) महिला वाहक दर्शवितात. तर प्रवाशांकडून जाणून बुजून हात लावण्याचा प्रकार घडत असल्याचे सर्वच 28(100 टक्के )महिला वाहक मान्य करतात. तसेच प्रवासी आसनाच्या बाजूला बसले असताना जाणून बजून झोपले असण्याचे सोंग घेवून स्पर्श करतात असे 20(71.42 टक्के ) महिला वाहक दर्शवित असून बस मध्ये गर्दि असताना तिकीट काढायला जात असताना मार्गात स्पर्श होईल या उददेशाने मधात उभे राहातात असे 25(89.28 टक्के) महिला वाहक दर्शवितात. त्याचबरोबर प्रवासी आसानाच्या बाजूला बसले असताना जाणून बजून नकार दिला असताना खान्याचे पदार्थ देवू करतात असे 12(42.85 टक्के) महिला वाहक दर्शवितात. मोठया आवाजातील अश्लिल व्हीडीओ पाहणे अथवा गाणे ऐकण्याचा प्रकार होत असल्याचे 08(28.57 टक्के) महिला वाहक दर्शवितात कार्यालयील कर्मचारी तथा अन्य व्यक्तींकडून लगट करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे 21(75.00 टक्के) महिला वाहक मान्य करतात. तर सह कर्मचारी अधिकाऱ्यांकडून अपमानास्पद वागणूक दिल्या जात असल्याचे 15(53.57 टक्के) महिला वाहक दर्शवितात. सुरक्षिततेच्या दृष्टीने धोक्याचे होईल अशा प्रकारे डयुटी लावल्या

जाण्याचे प्रकार घडत असल्याचे 17(60.71 टक्के) महिला वाहक दर्शवितात. त्याचबरोबर लैंगिक दृष्टीकोणातून शारीरिक जवळीक साधन्याचा प्रयत्न केला जात असल्याचे 10(35.71 टक्के) महिला वाहक दर्शवितात.

उपरोक्त आकडेवारी लक्षात घेता महिला वाहक हया लैंगिक छळाच्या बळी ठरत असून त्या कठीन परिस्थितीत नोकरी करतात.

## 2. लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासाठी उभारलेली यंत्रणा–

राजस्थान मध्ये आरोग्य विभागात 'साथिन' पदावर कार्यरत असलेल्या भंवरी देवी यांच्यावर झालेल्या सामूहिक बलात्कार प्रकरणामध्ये विशाखा संस्थेने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर निर्णय देतांना सर्वोच्च न्यायालयाने कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्या प्रकारची पाउले उचलावित याविषयीची गाईडलाईन्स जारी केली होती. ती 'विशाखा गाईडलाईन्स' म्हणून ओळखल्या जाते. या गाईडलाईन्स नुसार सर्व सरकारी–खाजगी, संघटीत–असंघटीत क्षेत्रातील कार्यालयांमध्ये तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक होते. पुढे 2013 मध्ये कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा अस्तित्वात आला. या कायदयामध्ये आस्थापनांनी तक्रार निवारण समिती स्थापन करावी. तथा साधारणतः असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाधीकाऱ्यांनी स्थानिक तक्रार निवारण समिती स्थापन करणे आवश्यक आहे.

या कायदयाची अंमलबजावणी एसटी महामंडळाने केलेली असल्याचे आढळून आले. बुलडाणा जिल्हयाअंतर्गत येणाऱ्या एसटी डेपो मध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन केल्याचे सर्वच महिला वाहक मान्य करतात. मात्र लैंगिक छळ होत असून सुध्दा त्यांनी या तक्रार निवारण समितीमध्ये लैंगिक छळाची तक्रार केली नव्हती. यामागचे कारण म्हणजे बहुतांश महिला वाहकांना लैंगिक छळामध्ये कोणत्या प्रकारचा समावेश होतो हे माहिती नव्हते. तसेच तक्रार केल्यास आपल्यावर कार्यवाही होण्याची भिती असल्याचे दर्शविण्यात आले. 25 टक्के महिला तक्रार करून उपयोग नाही त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नाही असे दर्शवित होत्या. तर 35 टक्के महिला वाहकांच्या मते पुरूषांना पाठीशी घालून त्याचा त्रास महिला वाहकांना होत असल्याचे दर्शवितात. जवळपास सर्वच महिला वाहकांनी प्रवाशांच्या लैंगिक छळासंदर्भात तक्रार न करण्याचे कारण म्हणजे हया घटना बस मध्ये घडत असून त्या क्षणिक असतात व त्यावर तेव्हाच प्रतिक्रिया दिल्या जाते किंवा मग दुर्लक्ष केल्या जाते असे दर्शविले. सर्व प्रवासी सारखे नसतात. एखादा अपवाद त्रासदायक असतो आणि दररोज बस मध्येच प्रवास करायचा असल्यामुळे शेकडो प्रवाशांशी संपर्क येतो त्यामूळ कोणा–कोणाची तक्रार करणार, तक्रारीमूळे डयुटी सोडून त्यावरील सुनावनीसाठी अधिक कालावधी जाणार यापेक्षा तक्रार न करता होत असलेला प्रकार दुर्लक्षिलेला बरा असे विचार सर्व महिलांनी व्यक्त केले.

## ▪ निष्कर्ष–

महिला सक्षमिकरणाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने वाहक पदावर महिलांची नियुक्ती केली. मात्र सततचा बसचा प्रवास, बसमधील प्रवाशांची गर्दी यावर तोडगा निघू शकला नाही तथा बस मध्ये महिला वाहकांचे लैंगिक शोषण झाल्यास त्यावर सुरक्षात्मक उपाय अदयाप शोधू शकले नाही. महिला वाहक सुध्दा लैंगिक छळाच्या प्रकाराविषयी फारशा जागृक नाहीत. ज्या–ज्या वेळी लैंगिक छळाचे प्रकार होतात त्यावेळी तेथेच प्रतिकार करून प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्या जाते. तर कार्यालयीन कर्मचाऱ्यांकडून सुध्दा लैंगिक छळ होतो असे असतानाही त्याची तक्रार नोंदविल्या जात नाही. याचाच अर्थ एसटी महामंडळाने उभारलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांविषयी महिला वाहकांमध्ये विश्वास नाही.

## सारणी 1
## प्रवासी वाहतूक व कार्यालयीन कामकाजा दरम्यान छळाचे स्वरूप

| अक्र | लैंगिक छळाचे स्वरूप | छळाची स्थिती | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | **होय** | **नाही** | |
| 1 | प्रवाशांकडून असूरक्षित स्पर्श करणे | 22(78.57) | 06(21.42) | 28(100) |
| 2 | प्रवाशांकडून जाणून बुजून हात लावणे | 28(100) | 00(00.00) | 28(100) |
| 3 | प्रवासी आसनाच्या बाजूला बसले असताना जाणून बजून झापले असण्याचे सोंग घेवून स्पर्श करणे | 20(71.42) | 08(28.58) | 28(100) |
| 4 | बस मध्ये गर्दि असताना तिकीट काढायला जात असताना मार्गात स्पर्श होईल या उददेशाने मधात उभे राहाणे | 25(89.28) | 03(10.68) | 28(100) |
| 5 | प्रवासी आसानाच्या बाजूला बसले असताना जाणून बजून नकार दिला असताना खान्याच्या पदार्थ देवू करणे | 12(42.85) | 16(57.15) | 28(100) |
| 6 | मोठया आवाजातील अश्लिल व्हीडीओ पाहणे अथवा गाणे ऐकणे | 08(28.57) | 20(71.43) | 28(100) |
| 7 | लगट करण्याचा प्रयत्न करणे | 21(75.00) | 07(25.00) | 28(100) |
| 8 | सह कर्मचारी अधिकाऱ्यांकडून अपमानास्पद वागणूक | 15(53.57) | 13(46.43) | 28(100) |
| 9 | सुरक्षिततेच्या दृष्टीने धोक्याचे होईल अशा प्रकारे डयुटी लावणे | 17(60.71) | 11(29.29) | 28(100) |
| 10 | लैंगिक दृष्टीकोणातून शारीरिक जवळीक साधने | 10(35.71) | 18(64.29) | 28(100) |

**(कंसातील आकडेवारी टक्केवारी द[illegible]विते)**

## ▪ संदर्भ ग्रंथ सूची

PUSH (2015). The Sexual Harssment Of women at workplace (Prevention, Prohibition and Redressal) Act 2013".Mumbai. Maharashtra State Commission for Women.

Poonia, Astha.(2019). Sexual Harassment at Workplace. Amity International Journal of Juridical Sciences (Vol. 5, 2019)

Pandey Geeta (2017). Bhanwari Devi: The rape that led to India's sexual harassment law.BBC News. Jaipur. 17 March